ORDER
SEEN

जावक क्रं. 1029 /2026
लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे
दिनांक 11.02.2026

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.02.17 17:27:10 +0530

प्रति,
मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सो
कोर्ट कोल्हापूर,
यांना सविनय सादर.

EXH.4

CRIMINAL M A 153-2026

प्रतिवेदक- डि.एम.गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक, लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे,
यांज कडून विनंती पुर्वक की,

विषय - फौजदारी किरकोळ अर्ज क्रं.153/2026 मध्ये म्हणने सादर केले बाबत

***********************

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे गु.र.नं.310/2025 मुंबई जुगार कायदा कलम 4 व 5 प्रमाणे दाखल गुन्हयातील जप्त मुद्देमाल वर्णन - होन्डा शाईन मोटर सायकल नंबर MH-09-EC-0972 ही गाडी ताब्यात मिळावी म्हणून अर्जदार राजीव बाळू सातारकर, वय 38 रा.1447 ई वॉर्ड राजारमापुरी 10 वी गल्ली कोल्हापूर यांनी मा.न्यायालयात बी एन एस एस कलम 503 प्रमाणे अर्ज सादर केला आहे.

मोटर सायकल ताब्यात न देणे बाबतची कारणे खालील प्रमाणे :-

1)सदर गुन्हयातील जप्त होन्डा शाईन मोटर सायकल नंबर MH-09-EC-0972 ही घटनास्थळी मिळून आल्याने जप्त केली असल्याने सदरचा मुददेमाल हा अंत्यत महत्वाचा पुरावा आहे.

2) सदर गुन्हयातील जप्त होन्डा शाईन मोटर सायकल नंबर MH-09-EC-0972 ही अर्जदार यांचे ताब्यात दिलेस तो सदर मोटर सायकलची विक्री करून पुरावा नाहीसा करण्याची शक्यता आहे.

3) सदर गुन्हयातील जप्त होन्डा शाईन मोटर सायकल नंबर MH-09-EC-0972 ही अर्जदार यांचे ताब्यात दिलेस तो अशा प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता आहे.

वरील कारणास्तव गुन्हयातील जप्त होन्डा शाईन मोटर सायकल नंबर MH-09-EC-0972 ही अर्जदार यांचे ताब्यात देण्यात येवू नये असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे.

सविनय सादर

(डि.एम.गायकवाड)
सहाय्यक पोलीस निरीक्षक
लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे

दाखल व पाहून रवाना
ता. / /

पो. नि. लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे

२२०२

जावक क्र.            /२०२६
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,
कोल्हापूर
दिनांक ०६/०२/२०२६

**(मा.पी. बी. राजपूत)**
मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. ११, कोल्हापूर यांच्या
न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १५३/२०२६

प्रति,
पोलिस निरीक्षक
पोलिस ठाणे लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

विषय - किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १५३/२०२६ मधील जप्त
मुददेमाल विषयी म्हणणे सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणास कळविणेत येते की, या न्यायालयातील किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १५३/२०२६ मध्ये अर्जदार राजीव बाळु सातारकर तर्फे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे जप्त मुददेमाल परत मिळणेसाठी अर्ज दाखल करणेत आला आहे. लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे गु.र.नं. ३१०/२०२५ मध्ये मुददेमाल जप्त करणेत आलेला असून सदर कामी आपले म्हणणे दिनांक १२/०२/२०२६ इ. रोजी या न्यायालयात सादर करावे असा आदेश केलेला आहे.

तरी पु. ने. ता. १२/०२/२०२६ इ रोजी किंवा तत्पुर्वी या न्यायालयात लेखी म्हणणे पाठवावे.

आज दिनांक ०६/०२/२०२६ इ. रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

MAGISTRATE F.C. COURT No. 1 KOLHAPUR

क. लिपीक

हुकूमावरुन
06/02/2026
सहा. अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,
कोल्हापूर

**पोलीस निरीक्षक**
**लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर**